# गझल मानवी मनावर प्रभाव टाकणारा काव्य प्रकार

**-डॉ. मधुकर खराटे**

गझल मानवी मनावर प्रभाव टाकणारा काव्यप्रकार असून त्यातून समाजातील विविध समस्यांवर चिंतन व्यक्त केले जात आहे असे विचार बोदवड महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख व महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. मधुकर खराटे यांनी पारनेर महाविद्यालयात, पारनेर येथे हिंदी गझल या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रा प्रसंगी व्यक्त केले.

दि. २१ व २२ डिसेंबर २०१८ या दरम्यान न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, पारनेर येथे महाराष्ट्र हिंदी परिषदेचे वार्षिक अधिवेशन व " समकालीन हिंदी गझल" या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. प्रसंगी डॉ. मधुकर खराटे द्वारा संपादित " हिंदी गजल का परिदृश्य" या ग्रंथाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे माजी हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पांडुरंग पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर समारंभास डॉ. माधवी जाधव ( कोल्हापूर ), डॉ. अरुण घोगरे ( अमरावती ), डॉ. अनिल साळुंखे ( सोलापूर ), श्री. वीरेंद्र शुक्ल ( कानपूर ) आदि मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय चर्चासत्रात विविध राज्यातील एकूण १७० प्रतिनिधी उपस्थित होते. मुंबई येथील महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शीतला प्रसाद दुबे, पुणे विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सदानंद भोसले, डॉ. मिथिलेश अवस्थी ( नागपूर ), डॉ. सुनील कुलकर्णी ( जळगाव ), डॉ. हनुमंत जगताप ( नगर ), डॉ. चंद्रदेव कवडे ( औरंगाबाद ), डॉ. अंबादास देशमुख ( लातुर ), डॉ. बाबासाहेब कोकाटे ( बीड ), डॉ. शहाबुद्दीन शेख ( नेवासा ) आदि मान्यवरांनी या चर्चासत्रात आपले मौलिक विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. विजय राऊत यांनी अत्यंत चोखपणे केले.






